**रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व जुनिअर कॉलेज ( विज्ञान ),एम.सी.व्ही.सी विभाग,सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक शाळा,नेर्ले ता,वाळवा. जिल्हा,सांगली.यांच्या संयुक्त विद्यमानाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची 136 वी जयंती सोहळा पार पडला.**

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय चंद्रकांत दळवी साहेब IAS (Retd.) चेअरमन, रयत शिक्षण संस्था सातारा हे लाभले तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. डॉ. एम बी शेख (विभागीय अध्यक्ष, दक्षिण विभागीय सल्लागार मंडळ ) हे होते व प्रमुख उपस्थितीत श्रीमती सरोज नारायण पाटील उर्फ माई (जनरल बॉडी सदस्या,रयत शिक्षण संस्था,सातारा ) तर प्रमुख वक्त्या म्हणून मा.डॉ. अलका लोखंडे (माजी मुख्याध्यापिका, रयत शिक्षण संस्था सातारा) होत्या, तसेच विभागीय अधिकारी मा. हणशी साहेब व सहाय्यक विभागीय अधिकारी मा. शेटे साहेब हे देखील या कार्यक्रमास उपस्थित होते.या कार्यक्रम प्रसंगी रांगोळी प्रदर्शन भरवण्यात आले होते त्याची पाहणी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.
या कार्यक्रम प्रसंगी बोलताना आदरणीय दळवी साहेबांनी कर्मवीर भाऊराव पाटलांचा इतिहास मांडत कर्मवीर अण्णा कशाप्रकारे गावोगावी जाऊन शाळा उभारत तसेच कमवा व शिका योजना सुरू केली अनेक बोर्डिंग उभा केली. नेर्ले सारख्या गावामध्ये अण्णांनी स्वतः येऊन शाळा काढली तसेच मुष्टी फंड योजना याच गावांमध्ये सुरू झाली होती अनेक शाखांना व संस्थेला प्रेरणादायी ठरली तसेच नेर्ले गावाने शाखेला व संस्थेला देणगीतून एकूण 16 एकर जमीन दिली याचा देखील आवर्जून उल्लेख केला.
विद्यालयातील उपक्रमांचे आदरणीय साहेबांनी कौतुक केले तसेच रयत शिक्षण संस्थेला आता गुणवत्तेच्या बाबतीत पुढे घेऊन जायचं आहे आणि हे काम फक्त माझा रयत सेवक करू शकतो असे विचार साहेबांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.
विद्यालयाची प्रगती पाहून साहेबांनी स्कूल कमिटी सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समिती विद्यार्थी शिक्षक पालक व हितचिंतक ग्रामस्थ यांचे कौतुक करत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती माळी एल.के.मॅडम यांचे कौतुक केले व शाळेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




